**स्थायी निर्देश क्र. ४५**

**नगरपरिषद / नगरपंचायत प्रशासकीय कार्यालयात CCTV बसविणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
शासकीय परिवहन सेवा ईमारत
३ रा मजला, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०
**नपप्रसं /२०१६/CCTV/प्र.क्र.११३/का-०७**
**दि.२८ सप्टेंबर २०१६**

**वाचा** :- माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दि.४.३.२०१३

राज्य शासनाने दि. ०४/०३/२०१४ अन्वये शासकीय कार्यालयामध्ये CCTV बसविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी तसेच नगरपरिषद / नगरपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी आणि नगरपरिषद / नगरपंचायतीची मालमत्ता यांना हानी पोहोचू नये याकरिता CCTV बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरचे CCTV प्रामुख्याने नगरपरिषद/नगरपंचायतीसमोर असलेले रस्ते, प्रवेशद्वार, इमारत परिसर, पॅसेज, मुख्याधिकारी कक्ष, बैठक कक्ष इत्यादी ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे बसविण्यात यावेत. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांचेमार्फत या संचालनालयास सादर करण्यात यावा.

मुख्याधिकारी यांनी वेळोवेळी हे रेकॉर्डिंग होत असल्याबाबत खात्री करावी व याकरिता नगरपरिषदेमधील संगणक विभागीय प्रमुखास किंवा मुख्याधिकारी यांना योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यास याची जबाबदारी द्यावी. सदरचे रेकॉर्डिंग हे किमान एक महिन्यापर्यंत साठवून ठेवण्यात येईल अशी व्यवस्था मुख्याधिकारी यांनी करावी.

वरिल आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(विरेंद्र सिंह)
**आयुक्त तथा संचालक**
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

प्रत :-

१) मुख्याधिकारी, (सर्व) नगरपरिषद/नगरपंचायत.
२) जिल्हाधिकारी, (सर्व) मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून.
३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व).

प्रत माहितीस्तव सविनय सादर:- मा. सचिव, नगरविकास विभाग (२) मंत्रालय, मुंबई.